## सनातनच्या सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्त्या साधकांचे अद्वितीयत्व !



श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ



कु. मधुरा भिकाजी भोसले

सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्ते साधक पृथ्वीवर कुठेही उपलब्ध नसलेले अध्यात्मातील विविध विषयांवरील सखोल अध्यात्मशास्त्रीय ज्ञान सूक्ष्मातून मिळवतात. ते धार्मिक विधी, यज्ञयाग आदींचे सूक्ष्म-परीक्षणही करतात. ईश्वराकडून मिळणारे हे ज्ञान ग्रहण करण्यासाठी त्यांना आसुरी शक्तींच्या आक्रमणांनाही तोंड द्यावे लागते. असे असले, तरी गुरुकृपेच्या बळावर ते ही सेवा करतच आहेत.

---

## प्रस्तुत ग्रंथाची अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)

१. ‘भाव’ या शब्दाची व्युत्पत्ती आणि अर्थ ९

२. ‘भाव’ या शब्दाच्या व्याख्या ९

२ अ. ‘भाव म्हणजे ईश्वराच्या अस्तित्वाची सतत जाणीव असणे.’ ९

२ आ. ‘भाव म्हणजे ईश्वराला जाणून घेण्याची जिवात असलेली तीव्र तळमळ. ९

३. भावाचे घटक १०

४. भावाची वैशिष्ट्ये ११

४ अ. भाव आणि रंग ४ आ. भावाचा आकृतीबंध ११

४ इ. पवित्रके आणि भाव १३

४ ई. ‘देवतेतील चैतन्य हे व्यक्तीतील भावाप्रमाणे असते.’ १४

**५. भावाचे महत्त्व** १५

५ अ. भाव ब्रह्मस्वरूपच असणे ५ ई. ईश्वर भावाचा भुकेला १५

५ ऊ. भावाप्रमाणे फळ ५ अं. भवसागर आणि भावसागर १६

**६. भावानुसार परिणाम** २१

६ आ. कोणताही नामजप करतांना ‘हा गुरुमंत्र आहे’ असा भाव ठेवून नामजप केल्यास नामजपातून गुरुमंत्राचे लाभ मिळणे २१

६ उ. भावाच्या विविध स्तरांवर देवाणघेवाण पूर्ण होण्याची प्रक्रिया २४

**७. भावाचे लाभ** २५

**८. भावाचे प्रकार** २८

८ ई. वात्सल्यभाव ८ उ. कृतज्ञतेचा भाव ४१

८ ऊ. शरणागत भाव ८ ओ. राजसिक अन् तामसिक भाव ६२

**९. एखाद्या व्यक्तीत ‘भाव आहे’ हे कसे ओळखायचे ?** ६९

**१०. भाव वाढण्याच्या प्रक्रियेच्या संदर्भातील टप्पे** ६९

**११. भावनिर्मिती** ७०

११ अ. रसनिर्मिती आणि भावनिर्मिती ७०

**१२. भावावस्था आणि भावातीत अवस्था** ७८

१२ अ. गोपींची भावावस्था १२ आ. भावाच्या पुढचे टप्पे ७८

**१३. भाव आणि इतर** ८०

**१४. भाव आणि अनुभूती** ९१

**१५. सनातनचे साधक आणि भाव** ९५

卐 **प्रस्तुत ग्रंथाचे असामान्यत्व लक्षात घ्या !** ९८

卐 **संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती** १०१

## 卐 — ‘भावजागृतीसाठी साधना’ या ग्रंथमालिकेचे मनोगत — 卐

‘नाथा तुझ्या पायी जैसा ज्याचा भाव । तैसा त्यासी ठाव चरणी तुझ्या ॥’, असे भावाचे महत्त्व आमचे गुरु प.पू. भक्तराज महाराज यांनी वर्णिले आहे. ईश्वराच्या सगुण तत्त्वाची उपासना करणाऱ्या साधकाचा सगुणाकडून निर्गुणाकडे जाण्याचा, म्हणजेच अद्वैतापर्यंतचा प्रवास भावामुळेच शक्य होतो. साधकाच्या आध्यात्मिक जीवनात भावाचे असे अनन्यसाधारण महत्त्व असतांनाही साधना करणाऱ्यांपैकी बहुतेकांना भाव म्हणजे नेमके काय, भावाची लक्षणे कोणती, भावाचे प्रकार कोणते, भाव जागृत करण्यासाठी काय प्रयत्न करावेत, भावाचे टप्पे कोणते इत्यादींविषयी ज्ञान नसते. हे ज्ञान जिज्ञासू आणि साधक यांना मिळावे, यासाठी ‘भावजागृतीसाठी साधना’ या ग्रंथमालिकेचे प्रयोजन आहे.

## प्रस्तुत ग्रंथाचे मनोगत

‘भाव’ म्हटले की, देवता किंवा गुरु यांच्याप्रती प्रकट होणारा सगुण भाव, एवढाच मर्यादित अर्थ बहुतेकांना ज्ञात असतो. निर्गुण तत्त्वाची प्राप्ती करून देणाऱ्या भावाचे त्या त्या स्तरानुसार विविध प्रकार असतात. हे प्रकार अभ्यासल्यास भावजागृतीसाठी प्रयत्न करण्याच्या संदर्भात एक नवी दृष्टी लाभते. या अनुषंगाने प्रस्तुत ग्रंथ मार्गदर्शक ठरतो. या ग्रंथात व्यष्टी भाव आणि समष्टी भाव, व्यक्त भाव आणि अव्यक्त भाव, कृतज्ञता भाव अन् शरणागत भाव यांसारखे भावाचे विविध प्रकार आणि त्यांचा मनुष्यावर अन् त्याच्या साधनेवर होणारा परिणाम यांचे विवेचन दिले आहे. त्याचसमवेत एखाद्यात ‘भाव आहे’ हे कसे ओळखायचे, साधनेमध्ये शीघ्र उन्नती करण्यासाठी तळमळ आणि भाव यांची सांगड घालणे का आवश्यक आहे, भावानुसार साधकाभोवती असलेल्या चैतन्यकणांच्या कवचाचा रंग इत्यादी अनेक नाविन्यपूर्ण पैलू स्पष्ट केले आहेत. ‘विचार आणि भावना पालटल्या की कृती पालटते अन् कृती पालटली की विचार आणि भावना पालटतात’, या तत्त्वानुसार भाव निर्माण होण्यासाठी मन अन् बुद्धी यांच्या स्तरावर सतत कृती करत राहिल्यास भावजागृती निश्चितच होते.

भावजागृतीच्या प्रयत्नांना आरंभ करून अंती भावातीत अवस्थेपर्यंत कसे जायचे, याविषयीचे मार्गदर्शनही या ग्रंथातून लाभेल.

ईश्वरी कृपेमुळे सनातनच्या साधकांना मिळालेले हे ज्ञान उच्च स्तराचे असल्याने समजण्यास थोडे कठीण आहे. असे असले तरी जिज्ञासा आणि तळमळ असल्यास प्राथमिक अवस्थेतील साधकालाही या ज्ञानाचे आकलन होणे शक्य आहे.

या ग्रंथातील ज्ञानाचा उपयोग प्रत्येकाने स्वतःमधील भाव वृद्धींगत करून ईश्वरप्राप्ती करण्यासाठी करावा, ही श्रीगुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या ‘सच्चिदानंद परब्रह्म’ या उपाधीविषयी विवेचन !

‘१३.७.२०२२ पासून ‘सप्तर्षी जीवनाडीपट्टी’च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना ‘सच्चिदानंद परब्रह्म’ ही उपाधी लावण्यात येत आहे. त्यापूर्वी त्यांना ग्रंथांमध्ये ‘प.पू.’ आणि ‘परात्पर गुरु’ या उपाध्यांनी संबोधले आहे. यानुसार ग्रंथाच्या मुखपृष्ठावर आणि ग्रंथात तसा तसा उल्लेख केला आहे.

## सनातनच्या दोन सद्‌गुरूंच्या नावांच्या आधी विशिष्ट आध्यात्मिक उपाधी लावण्यामागील कारण

जीवनाडीपट्टी-वाचनाद्वारे सप्तर्षींनी केलेल्या आज्ञेनुसार १३.५.२०२० पासून सद्‌गुरु (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ यांना ‘श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ’ आणि सद्‌गुरु (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ यांना ‘श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ’ असे संबोधले जात आहे. या संतद्वयी सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी आहेत.